दैनिक

# आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com




"जनतेचा विश्वास आणि विकासाचा ध्यास घेऊन काम करणारे लोकप्रिय आमदार मा. श्री. भिमराव आण्णा तापकीर साहेब यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा!

## आदरणीय मा. श्री. आमदार भिमराव आण्णा तापकीर

**वाढदिवस विशेषांक**


● वर्ष : ०२ ● अंक : २५७ ● पुणे ● सोमवार, दि. ०१ सप्टेंबर २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313









# डरकाळ्यांची धडकी

ऐन सणावाराच्या धामधुमीत नाशिकमध्ये हजारो लोकांच्या सहभागाने एक मोर्चा निघाला. हा जनक्षोभ होता चक्क बिबट्या आणि त्याहीपेक्षा वन विभागाविरुद्ध. नाशिकचाच एक भाग असलेल्या वडनेर परिसरात दोन-अडीच वर्षांच्या बालकाला बिबट्याने उचलून नेले. मूल दारापुढे खेळत असताना, त्याच्या जन्मदात्यासमक्षच ऐन राखीपौर्णिमेच्या पूर्वसंध्येला ही घटना घडली.

या चिमुरड्याच्या कलेवराला त्याची लहानशी बहीण राखी बांधतानाचे दृश्य पाहून उपस्थितांचे हृदय पिळवटून निघाले. प्रसारमाध्यमांतील छायाचित्र पाहून सामान्यांच्याही डोळ्यांच्या कडा पाणावल्या. दुर्दैवाने त्याच दिवशी दिंडोरीतसुद्धा या हिंस्र श्वापदाच्या हल्ल्यात एका महिलेने जीव गमावला. या सलगच्या दोन घटनांमुळे लोकांच्या संतापाचा उद्रेक झाला. हजारो जण रस्त्यावर उतरले. त्यातून पिंजरे लावण्यासह नरभक्षी बिबट्यांना थेट गोळ्या घालण्याचीही मागणी न यावी तरच नवल!

बिबट्याला बिबट, बिबळ्या वा ग्रामीण भागात थेट ‘वाघ’च म्हटले जाते. देशात सुमारे १३ हजार बिबटे असल्याचे केंद्राचा २०२३चा अहवाल सांगतो. महाराष्ट्रात मध्य प्रदेशनंतर सर्वाधिक दोन हजार बिबटे आहेत. प्रत्यक्षात त्यांची संख्या दुप्पट-तिप्पट असावी, असा अभ्यासकांचा अंदाज आहे. राज्यात वर्षाकाठी तीस ते चाळीस बिबट्यांचा मृत्यू होतो. यापैकी बरेचसे अपघातात, तर काही शिकारीला बळी पडतात. वाघाच्या हल्ल्यात कोणी ठार होण्याच्या वृत्ताने जसा विदर्भवासीयांचा दिवस जात नाही, तसे राज्याच्या



इतर भागांत बिबट्यांच्या हल्ल्याबाबत घडत असते. नाशिक परिसरात तर रोजच उपद्रव ठरलेला. या भागात ही श्वापदे पाचशेपेक्षा अधिक आहेत.

‘उदंड जाहले बिबटे’ अशी स्थिती असल्याने त्यांच्या हल्ल्याची आरडाओरड सतत सुरूच असते. अधूनमधून लहान मुले वा कधी मोठी माणसेही त्यांची शिकार ठरल्याच्या घटना घडतात. नाशिक-अहिल्यानगर परिसरात गेल्या वर्षात या जमातीने तब्बल तीस लोकांना ठार केले. पाळीव पशूंची हानी तर खिजगणतीतही नाही. बिबट्यांच्या दहशतीपायी शहरालगतच्या क्षेत्रांत लहान मुलांचे खेळ थांबले आहेत. माणसे सांजवेळीच्या आधीच शेतशिवारातून बाहेर पडू लागली आहेत. काही गावांत दिवसाही मुले-वयोवृद्ध मंडळी बाहेर पडत नाहीत.

बिबट्या हा प्रचंड अनाकलनीय प्राणी आहे. एक वेळ वाघाच्या वर्तनाचा अंदाज बांधला जाऊ शकतो; परंतु, बिबट्याबाबत सारेच अंदाज फोल ठरतात. तो अनेकदा पिंजऱ्यात येऊन जातो, तरी अडकत नाही. हा प्राणी अगदी सहज अधिवास बदलत असल्याने मानवाशी त्याचा संघर्ष ठरलेला. नाशिकलगत गोदावरी, दारणा, वालदेवी या नद्यांच्या काठांवर ऊस क्षेत्र वाढल्याने त्यांना लपण्यासाठी सुरक्षित जागा मिळते. ‘फास्ट फूड’सुद्धा सहज उपलब्ध होते. रात्रीच्या सुमारास शहरालगतच्या कचऱ्यात कुत्री, बकऱ्या खाद्य शोधतात आणि ते आयतेच बिबट्यांचे खाद्य बनतात. जंगले कमी होतच आहेत. मात्र, तेथील शिकारीपेक्षा शहरालगत कोंबडी, डुक्कर, कुत्रे, शेळी, बकरी व इतर पाळीव प्राण्यांची शिकार बिबट्यांना सहज शक्य होते.

अलीकडे बिबट्याचीसुद्धा जीवनशैली बदलली. जन्माला येणाऱ्या बछड्यांपैकी पूर्वी एखादाच जगत असे. आता मात्र चारही बछडे जगत असल्याचा निष्कर्ष वन विभागाने काढला आहे. त्याचे जन्म, सावज शोधण्याचे प्रशिक्षण आणि मृत्यूही जंगलाऐवजी उसालगतच होत असल्याचे दिसते. खरे तर ही श्वापदे जगविताना, त्यांच्या सुरक्षित अधिवासाच्या उपाययोजना करताना, माणसांच्या जिवाला धोका होणार नाही, याचा प्राधान्याने विचार करण्याची हीच योग्य वेळ.

शहरात धुमाकूळ घालणारी हिंस्र श्वापदे जगवायची की माणसे, याचेही धोरण नजीकच्या काळात ठरवावे लागेल. वन विभाग, वन्यजीवप्रेमी आणि सरकारांचे सर्वसमावेशक प्रयत्न जसे गरजेचे आहेत, तशी नागरिकांच्याही वर्तनात सुधारणा आवश्यकच. अन्यथा, कबुतरे, कुत्री, मांजरांच्या उपद्रवाच्या मालिकेत बिबट्यांचाही समावेश व्हायचा आणि आणखी कोठे त्यांना थेट गोळ्या घालण्याची भाषा केली गेल्यास पंचाईत होऊन भलतेच प्रश्न निर्माण व्हायचे!

# किरकटवाडीतील अनिकेतचा संघर्ष

## उजवा हात गमावला; शिक्षणाची जबाबदारी हगवणे यांनी घेतली

**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

लहानगा अनिकेत बगाडे... दूषित पाण्यामुळे झालेल्या गुइलेन-बॅरे सिंड्रोमच्या झटक्यातून मृत्यूच्या दारातून परतलेला हा बालक आज गावकऱ्यांसाठी प्रेरणास्थान ठरतो आहे. उपचारांच्या काळात उजवा हात गमवावा लागला असला तरी शिक्षणाची आस आणि जगण्याची जिद्द त्याच्या चेहऱ्यावर दिसून येते.

किरकटवाडी मनपा शाळेत इयत्ता दुसरीत शिकणाऱ्या अनिकेतच्या आयुष्यात अचानक वादळ आलं. गुइलेन-बॅरे सिंड्रोमसारख्या दुर्मिळ आजारामुळे त्याच्या चालण्या-बोलण्यावरच नाही तर संपूर्ण कुटुंबाच्या आयुष्यावर सावट पडलं. मजुरी करणारे वडील आणि घरकाम करणारी आई – या दोघांनीही हार न मानता उपचारांसाठी जीवाचं रान केलं. गावकऱ्यांनीही शक्य ती मदत केली. अखेर अनिकेत मृत्यूशी झुंज देऊन जगला, पण उजवा हात गमावला. अशा परिस्थितीत त्याच्या पुढील शिक्षणाचा प्रश्नचिन्ह निर्माण झाला. यावेळी किरकटवाडीचे माजी उपसरपंच नरेंद्र हगवणे पुढे सरसावले. १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाच्या ध्वजारोहण सोहळ्यात त्यांनी जाहीर केले – “अनिकेतच्या संपूर्ण शिक्षणाची जबाबदारी मी घेतो.” या घोषणेने गावात दिलासा व आनंदाची भावना निर्माण झाली. अनिकेतचे शिक्षक व शाळेच्या मुख्याध्यापिका सांगतात – “तो हुशार आहे, अभ्यासात रस आहे.



परिस्थिती कठीण असली तरी तो नक्कीच यशस्वी होईल.” गावातील मित्रमंडळी, शिक्षक, समाजकार्यकर्ते सर्व त्याच्या पाठीशी उभे आहेत.

अनिकेतच्या संघर्षातून मिळणारा संदेश स्पष्ट आहे – अपंगत्व असलं तरी शिक्षणाची वाट थांबता कामा नये. समाजाने एकत्रितपणे मदतीचा हात दिल्यास अडचणी कितीही मोठ्या असल्या तरी त्यावर मात करता येते.

# हार्दिक जोशी यांच्या घरी गणेशोत्सव सोहळा

## ‘अरण्य’ थीम सजावट आकर्षणाचा केंद्रबिंदू

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

सुप्रसिद्ध अभिनेते हार्दिक जोशी यांच्या घरी गणेशोत्सवाचे आयोजन यंदा विशेष ठरले आहे. ‘अरण्य’ या आगळ्या-वेगळ्या थीमवर सजावट करण्यात आली असून, ती पाहण्यासाठी उपस्थितांना एक वेगळाच अनुभव घेता आला आहे.

हा सोहळा शनिवार, ३० ऑगस्ट रोजी दुपारी २ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत ट्युलिप रेसिडेन्स, फ्लॅट क्रमांक ७०३, पी. एल. देशपांडे गार्डन समोर, नवश्या मारुती मंदिर गल्ली, तिर्पे गणेश सुपर मार्केट मागे, पुणे येथे झाला आहे.

यावेळी दै. आरंभ पर्वचे पुणे शहर प्रतिनिधी महेश वरवटे यांनी अभिनेता हार्दिक जोशी यांच्याशी मनमोकळ्या गप्पा मारल्या.






# डॉ. गंगवाल यांची केंद्राकडे मागणी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शाकाहाराचे पुरस्कर्ते आणि सर्वजीव मंगल प्रतिष्ठानचे संस्थापक डॉ. कल्याण गंगवाल यांनी जैन समाजाचा “संवत्सरी- क्षमापना“ दिवस आंतरराष्ट्रीय स्तरावर “फॉरगेट /फ़ॉर्गिवनेस डे“ म्हणून साजरा करण्याची डॉ. कल्याण गंगवाल यांची केंद्र सरकारकड़े मागणी केली आहे. क्षमापना दिवस, ज्याला क्षमावाणी किंवा संवत्सरी असेही म्हणतात, हा जैन धर्मातील एक महत्त्वाचा दिवस आहे. या दिवशी जैन अनुयायी इतरांकडून आणि इतरांना क्षमा मागतात. हे पर्युषण पर्वाचा भाग आहे, जो आत्मशुद्धीचा काळ मानला जातो आणि या दिवसाच्या शेवटी "मिच्छामि दुक्कडं" हा शब्द वापरून क्षमा मागितली जाते. डॉ. गंगवाल म्हणाले की, जागतिक क्षमा दिन साजरा करण्यामागे एक अत्यंत सकारात्मक विचार आहे.

# अत्यावश्यक सेवेतील कर्मचाऱ्यांना गणेश मंडळांनी आरतीचा मान द्यावा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

संपूर्ण देशभरात मोठ्या उत्साहात गणेशोत्सव साजरा केला जातो. त्यातही पुणे शहराला सांस्कृतिक राजधानीचा मान लाभला आहे. भव्य-दिव्य देखावे, आकर्षक मंडप, मानाचे पाच गणपती, आगमन व विसर्जन मिरवणुका आणि वाद्य पथकांच्या तालावर होणारी सांस्कृतिक पर्वणी यामुळे पुणेकरांचा गणेशोत्सव संपूर्ण महाराष्ट्रात वेगळेपणाने ओळखला जातो. मात्र, या उत्सव काळात नागरिकांच्या सोयीसाठी अत्यावश्यक सेवेतले कर्मचारी दिवसरात्र कार्यरत असतात. पीएमपीएल वाहक, चालक, अधिकारी, तसेच पोलिस, आरोग्यसेवा कर्मचारी, अग्निशामक दल, होमगार्ड आणि इतर विभागातील कर्मचारी कोणतीही सुट्टी न घेता तत्परतेने सेवा बजावत असतात. त्यामुळे या कर्मचाऱ्यांना स्वतःच्या घरातील



- **पीएमपीएल वाहक तानाजी कांबळे यांची मागणी**

किंवा परिसरातील गणेशोत्सवात सहभागी होता येत नाही. या पार्श्वभूमीवर पीएमपीएलचे वाहक तानाजी कांबळे यांनी मागणी केली आहे की, “गणेश मंडळांनी आपल्या परिसरातील अशा कर्मचाऱ्यांना आरतीचा मान द्यावा. त्यांच्या सोयीप्रमाणे आरतीसाठी आमंत्रित केल्यास त्यांनाही गणरायाच्या या महोत्सवात सहभागी होता येईल.”

# व्हिएतनाममध्ये होणार दुसरी आंतरराष्ट्रीय आयुरहेल्थ परिषद

**पुणे(दै. आरंभ पर्व)**

भारताच्या प्राचीन परंपरेतील आयुर्वेद व योग शास्त्र हे जगभरात आज वाढत्या प्रमाणात लोकप्रिय होत आहे. शरीर, मन आणि आत्म्याचा समतोल राखण्यावर आधारित असलेल्या या विज्ञानामुळे आधुनिक जीवनशैलीशी निगडित आजारांवर (मधुमेह, स्थूलता, उच्च रक्तदाब, मानसिक ताण इ.) नैसर्गिक व प्रभावी उपाय मिळत आहेत. याच कारणामुळे आयुर्वेद व योग आता केवळ उपचार पद्धती न राहता समग्र जीवनशैलीचे विज्ञान म्हणून जगभरात मान्यता मिळवत आहे. या पार्श्वभूमीवर सिफा (Shiv International Fraternity of Ayurved ) या आंतरराष्ट्रीय पातळीवर कार्यरत संस्थेतर्फे, स्वान फाउंडेशन आणि शिव आयुर्वेद, सिंगापूर यांच्या सहकार्याने दुसरी आंतरराष्ट्रीय आयुरहेल्थ परिषद आयोजित करण्यात आली आहे. ही परिषद १ व २ नोव्हेंबर २०२५ रोजी व्हिएतनाममधिल हो-चि-मिन्ह सिटी येथे होणार असून, या महत्वपूर्ण परिषदेसाठी आयुष विभाग, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक तसेच Indian Embassy (व्हिएतनाम) यांचे सहकार्य लाभले आहे.

# खडकवासला ग्रामीण भागात चोरीचे सत्र सुरूच

## नागरिक त्रस्त; पोलिसांनी तपास करावा; तागुंदे

**खडकवासला (दै. आरंभ पर्व)**

खडकवाडी परिसरासह कुडजे, मांडवी, खुद्द, बहुली आणि अगळंबे या गावांमध्ये गेल्या अनेक दिवसांपासून चोरीच्या घटना वाढत चालल्या आहेत. सततच्या या घटनांमुळे नागरिकांत भीतीचे वातावरण पसरले असून पोलिसांकडून कोणतेही ठोस पाऊल न उचलल्याने लोकांमध्ये नाराजी वाढली आहे.

आतापर्यंत जवळपास पंधरा पेक्षा अधिक घरफोड्या झाल्या असून तपासाची गती अत्यंत मंद



असल्याचे चित्र आहे. त्यामुळे पोलिस प्रशासनावर दुर्लक्ष केल्याचे गंभीर आरोप होत आहेत.

या संदर्भात खडकवासला भाजपा अध्यक्ष ग्रामीण नवनाथ भाऊ तागुंदे यांनी सांगितले की, “ग्रामीण भागामध्ये प्रभावी ग्रामसुरक्षा यंत्रणा नसल्यामुळे चोरांना मोकळे रान मिळत आहे. परिसर डोंगर व नदीलगत असल्याने ही अडचण आणखी गंभीर बनली आहे. त्यामुळे पोलिसांनी तातडीने लक्ष घालून या चोरींचा तपास लावणे अत्यावश्यक आहे.”

नागरिकांच्या वाढत्या तक्रारी व असंतोषामुळे पोलिसांनी तात्काळ कारवाई करून सुरक्षिततेची हमी द्यावी, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे.

# पुर्व हवेलीतुन मराठा आंदोलनकर्त्यांना मदतीचा ओघ सुरू

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

पुर्व हवेलीतील लोणी काळभोर, कदमवाकवस्ती, सोरतापवाडी, पेठ, तरडे, कोरेगावमुळ इत्यादी गावातुन आंदोलनकर्त्यांना मदतीचा ओघ सुरू झाला असुन समस्थ मराठा बांधवांनी भाकरी, चपाती, लोणचं, चटणी, पाण्याच्या बाटल्या, बिस्कीट पुडे, फरसाण व इतर चिवडा आदी साहित्य घेऊन अनेक टेम्पो भरून आंदोलनाच्यास्थळी, म्हणजे मुंबईतील आझाद मैदानाकडे रवाना झाले आहेत. यामुळे देखील आंदोलनकर्त्यांना आधार मिळेल असे ग्रामस्थांनी सांगितले.मुंबई येथील आझाद मैदानावर मराठा समाजाच्या आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील उपोषणाला बसले असून त्यांना साथ देण्यासाठी हजारो मराठा आंदोलक मुंबईला गेले असुन सुरुवातीच्या दोन दिवसात या आंदोलनकर्त्यांच्या जेवणाचे हाल झाले. कारण आझाद मैदानापासून पंधरा किलोमीटर लांब त्यांच्या गाड्या लावण्यात आल्या होत्या. त्यामुळे त्यांचे खाण्यापिण्याचे खुपच हाल झाले. त्यानंतर महाराष्ट्रातून या आंदोलनकर्त्यांना मदतीचा ओघ सुरू झाला.

हवेली तालुका मराठा समाजाच्या वतीने आंदोलनकर्त्यांना मदत म्हणून भाकरी, चपाती, लोणचं, चटणी पाण्याच्या बाटल्या, बिस्कीट पुडे, फरसाण आदी साहित्य घेऊन टेम्पो पाठविण्यात आले आहेत. हवेली तालुका मराठा समाज मुंबई येथील आंदोलनकर्त्यांबरोबर सतत संपर्क ठेवून आहेत. कोरेगाव मुळ व हँपी ग्रुप तर्फे दोनशे किराणा किट तयार केले असुन ते उदया दुपारी एक वाजता टेम्पो रवाना करण्यात येणार आहे.किट मध्ये गव्हाचे पीठ, रवा, तेल, तांदूळ, पोहे, तुरडाळ, मीठ, लोणचे, साबण, हळद, बिस्कीट पुडे, इत्यादी वस्तु असुन या किटने करोना काळात केलेल्या मदतीची आढवण ग्रामस्थांना झाली.तसेच आंदोलनकर्त्यांना नागरिकांनी जास्तीत जास्त कोरडा शिधा देण्याचा प्रयत्न करावा.असे हँपी ग्रुपच्या सदस्यांनी आवाहन केले आहे. समाजातील विविध घटक—स्थानिक नागरिक, संघटना, राजकीय चळवळी—एकत्र येऊन आंदोलनाला मोठ्या प्रमाणावर आधार देत आहेत. सोरतापवाडी व परिसरातील नर्सरी उदयोजक सुध्दा मराठा आंदोलनकर्त्यांना मोठ्या प्रमाणावर मदत करत असुन जो पर्यंत आंदोलन चालू राहील तोपर्यंत त्यांना मदत करण्यासाठी नर्सरी उदयोजक कटिबद्ध असल्याचे अनेक नर्सरी व्यवसायिकांनी सांगितले. लोणी काळभोर, कदमवाकवस्ती येथून एक घर एक शिदोरी या प्रमाणे नागरिकांनी मदत करण्याचे आवाहन समस्थ मराठा बांधवांनी केले आहे.



# थोडक्यात



## पुण्यातील गणेशोत्सवात गंगा आरतीचा दिव्य अनुभव

- **केसरिया मित्र मंडळाचा अभिनव उपक्रम पुणेकरांच्या चर्चेत**

**पुणे (आरंभ पर्व) :** पुणेकरांसाठी यंदाचा गणेशोत्सव अधिक खास ठरणार आहे. कारण एफ.सी. रोडवरील केसरिया मित्र मंडळ यांनी यंदा पहिल्यांदाच गंगा आरतीचे आयोजन करून शहरात एक अनोखा उपक्रम राबविला आहे. संस्थापक अध्यक्षा भावना छाजेड यांच्या पुढाकारातून साकार झालेल्या या आरती सोहळ्याला नागरिकांकडून प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. वाराणसी किंवा हरिद्वार येथे अनुभवता येणारी गंगा आरती आता पुण्याच्या मध्यवर्ती भागात प्रत्यक्ष पाहायला मिळत आहे.दररोज दुपारी १२.३०, संध्याकाळी ७.३० आणि रात्री ९.३० वाजता होणारी ही आरती शंखनाद, मंत्रोच्चार व दिव्यांच्या प्रकाशात साकारते. त्यामुळे वातावरणात एक वेगळाच आध्यात्मिक अनुभव निर्माण होत आहे. एफ.सी. कॉलेज परिसरातील विद्यार्थी, स्थानिक रहिवासी व पुणेकर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून हा सोहळा अनुभवत आहेत. “गंगा आरती ही पुण्यात प्रत्यक्ष अनुभवता येईल असे कोणीच विचार केला नव्हता. मंडळाने दिलेली ही संधी पुणेकरांसाठी अभिमानाची आहे,” असे एका भाविकाने सांगितले. या उपक्रमात भावना छाजेड यांच्यासह प्रकाश वाडेकर, अमित देशपांडे, सौरभ छाजेड, विशाल, सुरज व साहिल यांच्यासह कार्यकर्त्यांचा उत्साहपूर्ण सहभाग आहे. गेल्या १६ वर्षांपासून गणेशोत्सवात समाजोपयोगी कार्यक्रम राबवणारे केसरिया मित्र मंडळ या अभिनव गंगा आरतीमुळे सध्या पुण्यात चर्चेचा विषय ठरले आहे.




## आ. भीमराव अण्णा तापकीर यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक जाणीव

- **रक्तगट तपासणी शिबिरांच्या माध्यमातून सप्ताहाची सुरुवात**

**वारजे (आरंभ पर्व) :** खडकवासला मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार मा. भीमराव अण्णा तापकीर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून या वर्षी वाढदिवस सप्ताहाची सुरुवात एका महत्त्वाच्या पण आजवर दुर्लक्षित राहिलेल्या सामाजिक प्रश्नावर करण्यात आली आहे. साधारणपणे विविध आरोग्य शिबिरे होत असतात, मात्र रक्तगट तपासणीची सुविधा अनेकदा विद्यार्थ्यांच्या आवाक्याबाहेर जाते. या तपासणीसाठी प्रत्येकी ५० रुपये खर्च येतो, त्यामुळे पुणे मनपा शाळांमधील सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थी वंचित राहतात. याची जाणीव ठेवून वारजे–शिवणे परिसरातील सुमारे ६ हजार विद्यार्थ्यांची रक्तगट तपासणी पूर्णपणे मोफत करण्याचा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. हा उपक्रम पुढील ९ दिवस राबविण्यात येणार आहे. त्याचे आयोजन भाजपा चित्रपट आघाडी पुणे शहराचे अध्यक्ष राजीव पाटील यांनी केले होते. सप्ताहाचा शुभारंभ कै. शामराव बराटे विद्यालय (दिगंबर वाडी) येथे विद्यार्थ्यांची रक्तगट तपासणी करून करण्यात आला. या उपक्रमाचे उद्घाटन पुणे महानगरपालिकेचे मा. नगरसेवक किरण भाऊ बारटक्के यांच्या हस्ते झाले. यावेळी खडकवासला मतदारसंघ भाजपा सरचिटणीस चेतन गोंडाळ, श्रीराम प्रतिष्ठानचे अध्यक्ष परशुराम यादव आदी मान्यवर उपस्थित होते.



## लहान वयात नवा आदर्श

**दुबई (आरंभ पर्व) :** दुबईत वास्तव्यास असलेली भारतीय वंशाची भावंडे जीविका धीरज जैन (वय १०) आणि जैनम धीरज जैन (वय १३) यांनी केवळ लहान वयात आयजीसीएसई १०वी बोर्ड परीक्षा उत्तीर्ण करून उल्लेखनीय कामगिरी केली आहे. सुरुवातीला JJFunTime या यूट्यूब चॅनेलवरून कंटेंट क्रिएटर म्हणून प्रवास सुरू केलेल्या या दोन्ही भावंडांनी विज्ञान प्रयोग, शैक्षणिक विषय व सर्जनशील आव्हाने मांडत शिक्षणाविषयीची जिज्ञासा वाढवली. शैक्षणिक यशाबरोबरच त्यांनी 1XL या जागतिक बिझनेस एज्युकेशन प्लॅटफॉर्मची सहसंस्थापना केली आहे तसेच ते दोघेही TEDx स्पीकर्स आहेत.




दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
सोमवार, दि. ०१ सप्टेंबर २०२५

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक





# मुख्यमंत्री आज पुण्यात

## सर्वात मोठा उड्डाणपूल वाहतुकीस खुला; अखेर मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शहरातील सिंहगड रस्त्यावर उभारण्यात आलेल्या दुहेरी उड्डाणपूल प्रकल्पाचे उद्घाटन १ सप्टेंबर दुपारी ३ वाजता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात येणार असल्याची माहिती नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी कळविली आहे. केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्यासह शहरातील सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. राज्यमंत्री मिसाळ म्हणाल्या, पुण्यातील "फनटाईम थिएटर ते विठ्ठलवाडी हा प्रवास आता अधिक सोपा, जलद आणि सुलभ होणार आहे. सिंहगड रस्ता परिसरातील दीर्घकाळाची वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी हा पूल अत्यंत महत्त्वाचा ठरेल."

दरम्यान, या उड्डाण पुलाचे उद्घाटन झाल्यानंतर पुण्यातील वाहतूक कोंडीचा मार्ग आणखी सुकर होणार असून पुणेकरांना लांब पल्ल्याच्या उड्डाण पुलाचा वापर करता येईल.

"पुणे हे महाराष्ट्रातील सर्वात वेगाने वाढणारे शहर असून लोकसंख्या आणि वाहनसंख्या झपाट्याने वाढत आहे. विशेषतः सिंहगड रस्ता परिसरात सकाळ-संध्याकाळ वाहतुकीचा ताण प्रचंड असतो. अशा परिस्थितीत ११८ कोटींचा सिंहगड रस्ता उड्डाणपूल प्रकल्प हा पुणे शहरातील एक महत्त्वाकांक्षी आणि तांत्रिकदृष्ट्या अत्याधुनिक प्रकल्प पूर्ण व्हावा म्हणून सातत्यपूर्ण पाठपुरावा केला."



**सिंहगड रस्ता परिसरात सकाळ-संध्याकाळ वाहतुकीचा ताण प्रचंड असतो. या परिस्थितीत ११८ कोटींचा सिंहगड रस्ता उड्डाणपूल प्रकल्प हा पुणे शहरातील एक महत्त्वाकांक्षी आणि तांत्रिकदृष्ट्या अत्याधुनिक प्रकल्प पूर्ण व्हावा म्हणून सातत्यपूर्ण पाठपुरावा केला. उड्डाणपुल वाहतुकीसाठी खुला होणार असल्याने प्रवास जलदगतीने आणि सुकर होईल.**

**- माधुरी मिसाळ, नगरविकास राज्यमंत्री**

### प्रमुख टप्पे

- **दुसरा टप्पा (१ मे, २०२५): विठ्ठलवाडी ते फनटाईम, २.१ किमी लांबीचा पूल (खर्च ६१ कोटी).**
- **तिसरा टप्पा (१ सप्टेंबर, २०२५): गोयल गंगा चौक ते इनामदार चौक, १.५४ किमी लांबीचा पूल (खर्च ४२ कोटी).**

### प्रकल्पाची माहिती

- **एकूण लांबी: सुमारे २.५ किमी – पुण्यातील सर्वात लांब उड्डाणपूल**
- **एकूण खर्च: ११८ कोटी रुपये**
- **कामाचा कालावधी: सप्टेंबर २०२१ ते ऑगस्ट २०२५ (नियोजित वेळेपेक्षा सहा महिने आधी पूर्ण)**

### वाहतुकीची कोंडी होणार कमी

- **दररोज हजारो प्रवासी, शालेय बस, व्यवसायिक वाहने आणि सार्वजनिक वाहतूक साधनांचा प्रवास अधिक सुकर.**
- **सिंहगड रस्त्यावरील प्रमुख चौक विना-अडथळा पार करण्याची सुविधा.**
- **नागरिकांचा दररोज १५ ते २५ मिनिटांचा प्रवास वेळ वाचणार.**
- **सिंहगड रस्ता, धायरी, नऱ्हे, खडकवासला, वडगाव बुद्रुक, नांदेड सिटी, तसेच बेंगळुरू–मुंबई राष्ट्रीय महामार्गाशी जोडणाऱ्या मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी कमी होणार.**

# प्रभाग तोडल्याच्या तक्रारींची शाहनिशा – उपमुख्यमंत्री

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महापालिकेच्या आगामी निवडणुकांसाठी प्रभागरचना करताना नैसर्गिक हद्दींकडे दुर्लक्ष करत चुकीच्या पद्धतीने प्रभाग तोडण्यात आल्याच्या तक्रारींची शाहनिशा केली जाईल.' अशी ग्वाही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. पुणे महापालिकेच्या हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या ३२ गावांच्या सर्वांगीण विकासाबाबत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी सर्किट हाऊस येथे बैठक झाली. पुणे महापालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांनी ३२ गावांतील सुविधांबाबत सादरीकरण केले. बैठकीमध्ये महापालिकेत समाविष्ट करण्यात आलेल्या ३२ गावांबाबत अनेक प्रश्न माजी नगरसेवकांनी मांडले. तसेच पुणे महापालिकेची प्रारुप प्रभाग रचना करताना नैसर्गिक सीमा असलेल्या



नदी, ओढे, रस्ते यांच्याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याच्या तक्रारी करण्यात आल्या. प्रभागरचना करताना प्रामुख्याने राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाची ताकद असलेले प्रभाग तोडल्याच्या तक्रारी माजी नगरसेवकांसह पदाधिकाऱ्यांनी केल्या. त्यावर याबाबत लेखी निवेदन द्यावे, त्याची शहानिशा करण्यात येईल, असे आश्वासन उपमुख्यमंत्री पवार यांनी दिले. 'प्रभागरचेबाबत घेण्यात आलेले आक्षेप हा महायुतीचा अंतर्गत प्रश्न आहे. या तक्रारींची शहानिशा करण्यात येईल,' असे पवार यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

पवार म्हणाले, 'पुण्यामध्ये नगरसेवकांचे वेगवेगळे मतप्रवाह आहेत. चर्चा करून प्रश्न मार्गी लावले जातील. पिंपरी-चिंचवडमध्ये जास्त काही बदल केलेले नाही. प्रभाग रचना हा महायुतीचा अंतर्गत प्रश्न आहे. वरिष्ठ पातळीवर निर्णय होईल.'






# लोणी काळभोर पोलीसांची बुलेट स्वारांवर कार्यवाही

**लोणी काळभोर (दै. आरंभ पर्व)**

लोणी काळभोर पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये बुलेटस्वार त्यांच्या बुलेट दुचाकीचे सायलन्सर बदलुन मोठमोठ्याने कर्णकर्कश्य आवाज काढुन फटाके फोडणाऱ्या बुलेट स्वारांवर लोणी काळभोर पोलिसांनी कडक कार्यवाही केली आहे . लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांनी सांगितले की लोणी काळभोर पोलिसांकडे बुलेट स्वारांच्या तक्रारी आल्या होत्या त्यानुसार लोणी काळभोर पोलीसांनी अशा टवाळखोर बुलेटस्वारांचा बंदोबस्त करण्याकरीता लोणीकाळभोर पोलीस ठाणेकडील पोलीस ठाणे स्तरावर वेगवेगळी पथके तयार करुन त्यांना लोणी काळभोर पोलीस ठाणे हद्दीतील कर्णकर्कष्य आवाज काढणाऱ्या दुचाकी गाड्यांचा शोध घेउन कारवाई करणेबाबत सांगितले होते .



मा. श्री. सचिन सुंबे

त्यानुसार लोणी काळभोर पोलीसांनी दि. ३०/०८/२०२५ रोजी पोलीस ठाणे हद्दीत प्रभावीरित्या गस्त घालुन कर्णकर्कष्य आवाज काढत तसेच बुलेटचे फटाक्यांसारखे आवाज काढत बुलेट दुचाकी चालवीणारे एकुण १८ दुचाकी चालकांच्या दुचाकी ताब्यात घेऊन या दुचाकीचे सायलेन्सर पोलीसांनी चेक केले असत्ता ते कंपनीचे नसल्याने त्यांच्यावर हडपसर वाहतुक विभागाचे पोलीस हवालदार सतिश टेंगले, पोलीस अंमलदार सचिन कांबळे यांच्यामार्फत कायदेशिर कारवाई करुन एकुण १८,०००/- रु. चा दंड वसुल करण्यात आला आहे. तसेच या दुचाकी गाड्यांचे मॉडीफाईड सायलेन्सर काढुन त्यांना कंपनीचे सायलेन्सर बसविण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे या दुचाकींचे कर्नकर्कष्य हॉर्न देखील काढुन घेणेत आले असुन त्याबाबत देखील कारवाई करणेत आली आहे.

ही कारवाई पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ०५, डॉ. राजकुमार शिंदे, सहाय्यक पोलीस आयुक्त, हडपसर विभाग, श्रीमती अनुराधा उदमले यांच्या मार्गदर्शनाखाली लोणी काळभोर पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे, सहा. पोलीस निरीक्षक सोमनाथ नाळे, पोलीस हवालदार रामहरी वणवे, वैजीनाथ शेलार, संदिप जोगदंड, रवि आहेर, महेश चव्हाण, सुनिल नागलोत, प्रदिप क्षिरसागर, तेज भोसले, मंगेश नानापुरे पोलीस शिपाई ईश्वर भगत, बालाजी बांगर हडपसर वाहतुक शाखेचे पोलीस हवालदार सतिश टेंगले, सचिन कांबळे यांनी केली आहे.

या कारवाई मुळे लोणी काळभोर परिसरातील कर्णकर्कष्य आवाज काढणाऱ्या बुलेट चालकांवर चाप बसविण्यात पोलीस प्रशासनास यश आले आहे. भविष्यात अशाच प्रकारच्या अत्यंत प्रभावी व दर्जेदार कारवाया कर्णकर्कष्य आवाज काढणाऱ्या बुलेटस्वारावर करणार असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांनी दिली .

## थोडक्यात



### मा. उपमहापौर ॲड. प्रसन्नदादा जगताप यांच्या निवासस्थानी बाप्पांचे आगमन

● गणेशोत्सवाचा जल्लोषमय माहोल

पुणे (आरंभ पर्व) : पुण्याचे माजी उपमहापौर ॲड. प्रसन्नदादा जगताप यांच्या निवासस्थानी यंदा गणरायाचे आगमन मोठ्या भक्तिभावात व उत्साहात झाले. सकाळपासूनच परिसरात मंगलमय वातावरण असून गणेश भक्तांच्या जयघोषाने घर दुमदुमून गेले. ढोल-ताशांच्या गजरात बाप्पांची मूर्ती घरात आणण्यात आली. पारंपरिक पद्धतीनं पूजा करून गणरायाचे स्वागत करण्यात आले. ॲड. प्रसन्नदादा जगताप यांनी बाप्पाच्या चरणी सर्व पुणेकरांसाठी उत्तम आरोग्य, सुख-समाधान व शांतीची प्रार्थना केली. "गणेशोत्सव हा ऐक्य, श्रद्धा आणि उत्साहाचा सण आहे. समाजात बंधुभाव टिकून राहावा व प्रत्येक घरात सुख-समाधान नांदावे," अशी मनोकामना त्यांनी व्यक्त केली. यावेळी त्यांच्या निवासस्थानी आकर्षक सजावट करण्यात आली होती. फुलांच्या तोरणांनी, रांगोळ्यांनी आणि प्रकाशमाळांनी परिसर उजळून निघाला होता. बाप्पांच्या आगमनाचा आनंद साजरा करण्यासाठी ॲड. प्रसन्नदादा जगताप यांचा परिवार सज्ज झाला होता. गणेशोत्सवाच्या निमित्ताने ॲड. प्रसन्नदादा जगताप यांनी सर्वांना गणेशोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.



### शेतकरी भागुजी गायकवाड यांचे निधन

राजगुरूनगर (आरंभ पर्व) : चिखलगाव (ता. खेड ) येथील प्रगतीशिल शेतकरी भागुजी लक्ष्मण गायकवाड (बुवा) यांचे दिर्घ आजाराने निधन झाले. ते ७० वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक विवाहीत मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. भागुजी गायकवाड हे खेड तालुक्याच्या पश्चिम भागात बुवा गायकवाड या नावाने सुपरीचीत होते. त्यांच्या ट्रान्सपोर्ट व्यवसायामुळे तालुक्यात त्यांचा मोठा जनसंपर्क होता. राजगुरुनगरच्या माजी ग्रामपंचायत सदस्या मनिषा सांडभोर या त्यांच्या कन्या तर खेड तालुका पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष व जेष्ठ पत्रकार बाळासाहेब सांडभोर हे त्यांचे जावई होत.

### पुरंदरमधील सहा शाळांना मिळाले मुख्याध्यापक



सासवड (आरंभ पर्व) : संचमान्यतेनुसार १५० विद्यार्थी पट असलेल्या शाळांना शासनाच्या वतीने पात्र मुख्याध्यापक दिले जातात याच प्रक्रियेतून शासनाच्या वतीने पुरंदर तालुक्यातील सहा शिक्षकांना मुख्याध्यापकपदी पदोन्नती मिळाली आहे, यामुळे तालुक्यातील सहा जिल्हा परिषद शाळांना आता पात्र मुख्याध्यापक मिळणार असल्याची माहिती शिक्षण विस्तार अधिकारी गोविंद लाखे यांनी दिली. मुख्याध्यापकपदी पदोन्नती झालेले शिक्षक (गावे) ; शोभा तुकाराम कामथे (बोपगाव) ,जयश्री रामदास जगताप (भिवरी),संगीता हिंगणे (सुपे खुर्द),श्वेता जगताप-लोणकर (शिवरी), विशाखा प्रताप मेमाणे(पिंपरी खुर्द), उषा केशव जाधव (नीरा नं.२) .

# मृत्यूंजय प्रतिष्ठानच्या ढोल-ताशांच्या गजराने पुणे दुमदुमले





**पुणे(दै. आरंभ पर्व)**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पुण्याचे वातावरण ढोल-ताशांच्या गजराने दुमदुमून गेले असून मृत्यूंजय प्रतिष्ठानच्या ढोल-ताशा पथकाने आपल्या जोशपूर्ण वादनाने पुणेकरांची मने जिंकली. 'नाद परंपरेचा' ही टॅगलाईन घेऊन प्रतिष्ठानने परंपरा, संस्कृती आणि उत्सवाचे महत्व अधोरेखित केले आहे. ताल, लय आणि ऊर्जा यांचा संगम साधत ढोल-ताशांच्या नादात पुण्याचे वातावरण भारून गेले. प्रतिष्ठानच्या वादनात केवळ गजर नव्हता तर त्यामागे शिस्त, एकत्रितता आणि संस्कृतीचे दर्शन घडले. तरुणाईला परंपरेशी जोडून ठेवण्याचा संदेश या वादनातून देण्यात आला.

गणेशोत्सवाच्या मिरवणुकीदरम्यान प्रतिष्ठानच्या वादनाने नागरिकांना उत्साह, ऊर्जा आणि अभिमानाची अनुभूती दिली. 'नाद परंपरेचा' या घोषवाक्याला साजेशी अशी ही अप्रतिम ढोल-ताशांची मैफल पुणेकरांसाठी अविस्मरणीय ठरली.

# वाफगावच्या विद्यालयात अवकाश निरीक्षण केंद्राचे उद्‌घाटन

## खेड तालुक्यातील एकमेव शाळेत अवकाश निरीक्षण केंद्र

**राजगुरुनगर-किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**

वाफगाव (ता.खेड) येथील श्रीमंत महाराजा यशवंतराव होळकर विद्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अवकाश निरीक्षण केंद्राचे उद्‌घाटन करण्यात आले. खेड तालुक्यातील एकमेव शाळेत अशा प्रकारचे अवकाश निरीक्षण केंद्र उभारण्यात आले असल्याने येथील विद्यार्थ्यांना खगोलशास्त्र व अंतराळ विषयक माहितीचे भांडार खुले झाले आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून हेंकल इंडिया लिमिटेडच्या सीएसआर निधीतून तसेच लायन्स क्लब पुणे, अहिल्यारत्न फौंडेशन, महाराजा यशवंराव होळकर जयंती उत्सव समिती व भारतीय युवक कल्याण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला. याप्रसंगी हेंकल इंडिया





● वाफगाव (ता.खेड) येथील होळकर विद्यालयात एस्ट्रॉनॉमी लॅब मध्ये खगोलशास्त्रीय माहिती घेताना विद्यार्थी, शिक्षक व इतर मान्यवर. ( छायाचित्र : किरण खुडे, राजगुरुनगर) ●

लिमिटेडचे रिजनल मॅनेजर पी. के. वर्मा, संशोधक डॉ. प्रसाद खंडागळे, लायन्स क्लब ऑफ पुणेचे अध्यक्ष मिलिंद तलाठी, ग्लोबल मिशन ऍस्ट्रॉनॉमीचे प्रा.विशाल कुंभारे, भारतीय युवक कल्याण केंद्राचे विकास माने, विठ्ठल कड्डू, पुण्यश्लोक साप्ताहिकाचे संपादक गणेश पुजारी, अहिल्यारत्न फौंडेशनचे विक्रांत काळे, उत्सव समितीचे योगेशराजे होळकर, योगेश काळे, स्कुल कमिटी सदस्य धनंजय भागवत, बाळासाहेब इंगळे, पोलिस पाटील ज्ञानेश्वर कराळे, गणेश कराळे, गणेश सुर्वे, मुख्याध्यापक नामदेव डोके तसेच शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

खगोल विषयक विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडावी खगोल व अंतराळ विषयक विद्यार्थ्यांमध्ये गोडी निर्माण व्हावी म्हणून ग्लोबल मिशन ऍस्ट्रॉनॉमी तर्फे पुणे जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात किमान एक अशा पंधरा एस्ट्रॉनॉमी लॅब शाळांमध्ये कार्यान्वित करण्यात आलेल्या आहेत. भविष्यातील खगोलशास्त्रज्ञ तयार करण्याची ही पहिली पायरी असल्याचे डॉ. प्रसाद खंडागळे यांनी सांगितले. मुख्याध्यापक नामदेव डोके यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण गोडे यांनी तर धनंजय भागवत यांनी आभार मानले.

# राजगुरू महाविद्यालयात मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन

**किरण खुडे**

**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**

येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयाच्या वतीने राष्ट्रीय क्रीडा दिन व हुतात्मा राजगुरू जयंतीचे औचित्य साधून मॅरेथॉन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. वरिष्ठ व कनिष्ठ गटातील स्पर्धेत १९५ विद्यार्थी स्पर्धकांनी स्पर्धेत सहभाग घेतला.

स्पर्धेचे उद्‌घाटन संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, हिरामण सातकर, चांडोली ग्रामीण रुग्णालयाचे डॉ.वाघमारे, डॉ. कांबळे , प्राचार्य डॉ.शिरीष पिंगळे, प्राचार्य डॉ. एच. एम.जरे,





उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे, प्रा. विठ्ठल दौंडकर उपस्थित होते.

विद्यार्थ्यांसाठी पाच कि.मी. तर विद्यार्थिनींसाठी तीन कि.मी. अशी स्पर्धा झाली. वरिष्ठ गटात मुलांमध्ये राहुल पारधी, संकेत भोईर, गौरव लोखंडे यांचा तर मुलींमध्ये सिद्धी कोहिनकर, समृद्धी दरवडे, पूर्वा कोतवाल यांचा अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक आला. तर कनिष्ठ गटात मुलांमध्ये तनिष भोकसे, गौतम चौधरी, ऋषिकेश भोकसे यांनी तर मुलींमध्ये श्रावणी लंगोटे, अंकिता मंडलिक, दिव्या सुतार यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकाविला. विजयी खेळाडूंचा सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक देऊन गौरव करण्यात आला. या स्पर्धेच्या निमित्ताने उपस्थित प्रमुख अतिथी, प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी स्वतःला व आपल्या कुटुंबाला तंदुरुस्त ठेवण्याची शपथ घेतली.

संचालक हिरामण सातकर यांनी मनोगतात विद्यार्थ्यांना शारीरिक व मानसिक दृष्ट्या तंदुरुस्त राहून स्वतःला सिद्ध करण्याचे आवाहन केले. या स्पर्धेचे आयोजन डॉ. प्रतिमा लोणारी, प्रा. सारिका गोरे, प्रा. योगेश मोहिते, प्रा.मोनाली काळे यांनी केले.

प्रास्ताविक प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, सूत्रसंचालन प्रा. मच्छिंद्र मुळूक तर आभार प्रा. सारिका गोरे यांनी मानले.





# पिरंगुट घाटात टेम्पो पलटी

**पिरंगुट (दै. आरंभ पर्व)**

पुणे कोलाड महामार्गावर पिरंगुट (ता.मुळशी) येथील घाट रस्त्यात फरशीची वाहतूक करणाऱा टेम्पो पलटी होऊन एकजण जागीच ठार झाल्याची घटना घडली. साजन कुमार (वय २६ वर्षे. पत्ता कळू शकला नाही.) असे मयत कामगाराचे नाव असून या अपघातात एक जण जखमी झाला आहे. बावधन पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन जखमीला उपचारासाठी दवाखान्यात हलविले आहे. आज सायंकाळी पावणे पाच वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली आहे. येथील घाट रस्त्यावरून पिरंगुटच्या दिशेने टाईल्स (फरशी ) भरलेला टेम्पो (एमएच १२ पीक्यू ७२१५ ) जात होता. येथील थोरल्या मोरीच्या खालील बाजूस तीव्र उतारावर टेम्पोचालकाचे नियंत्रण सुटल्याने टेम्पो पलटी झाला.

# जनतेचा विश्वास संपादन करणारे जनसेवक

## आमदार भिमराव आण्णा तापकीर यांच्या वाढदिवसानिमित्त विशेष लेख





● शब्दांकन ●
मा. श्री. प्रतिक गंगणे
● संकलन ●
मा. श्री. लक्ष्मण साबळे

**(दै. आरंभ पर्व)**

लोकसंग्रह, साधेपणा आणि प्रामाणिक कार्यशैली ही ओळख घेऊन राजकारणात पाऊल टाकणारे आमदार भिमराव आण्णा तापकीर यांचा आज वाढदिवस. आपल्या राजकीय वाटचालीत त्यांनी ग्रामीण भागापासून शहरापर्यंत सर्वसामान्य जनतेचा विश्वास संपादन केला आहे.

**सुरुवातीपासून लोकसेवेत रुजलेले पाऊल :** भिमराव आण्णा तापकीर यांना लहानपणापासूनच समाजकार्याची आवड असल्याने त्यांनी विविध सामाजिक संघटनांमधून कार्य करत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेपासून ते विधानसभेपर्यंतच्या प्रवासात त्यांनी प्रामाणिकपणे काम केले आहे.

**विकासाची गती :** आमदार तापकीर यांनी आपल्या मतदारसंघातील विकासकामांना विशेष प्राधान्य दिले आहे.

शिक्षण क्षेत्रात नवे उपक्रम, शाळा व महाविद्यालयांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या.

आरोग्य क्षेत्रात प्राथमिक आरोग्य केंद्रे सुसज्ज करणे, रुग्णवाहिका सेवा उपलब्ध करून देणे, जनजागृती कार्यक्रम राबवणे अशी कामे केली.

पायाभूत सुविधांमध्ये रस्ते, पाणीपुरवठा, वीज आणि मलनिस:रण यांसारखी मूलभूत कामे वेगाने मार्गी लावली.

शेतकऱ्यांसाठी सिंचन प्रकल्प, ठिबक सिंचन, शेतीमालाला बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी विशेष प्रयत्न केले.

**खेळाडू व तरुणांसाठी विशेष प्रयत्न :** तरुण वर्ग हा भविष्यातील देशाचा कणा आहे, या विचारातून आमदार तापकीर यांनी क्रीडा स्पर्धांना प्रोत्साहन दिले. ग्रामीण भागातील खेळाडूंना आवश्यक सुविधा आणि आर्थिक मदत उपलब्ध करून दिल्याने अनेक तरुणांनी राज्य व राष्ट्रीय स्तरावर आपले कौशल्य दाखवले आहे.

**सामाजिक जाणिवा आणि लोकसंपर्क :** त्यांच्या कार्यशैलीतील महत्त्वाचा भाग म्हणजे सतत लोकांमध्ये राहणे. कोणतीही समस्या असो – वैयक्तिक, सामाजिक किंवा शासकीय – ती ऐकून घेऊन मार्गदर्शन करणे, प्रशासनाशी पाठपुरावा करून जनतेला दिलासा देणे, ही त्यांची खासियत आहे. त्यामुळे आजही ते आपल्या मतदारसंघातील जनतेशी 'आपले माणूस' म्हणून जोडले गेले आहेत.

**आजच्या पिढीसाठी प्रेरणास्थान :** आमदार भिमराव आण्णा तापकीर यांच्या कार्यप्रवृत्तीमुळे अनेक तरुण त्यांना आदर्श मानतात. लोकाभिमुख राजकारण म्हणजे काय याचा आदर्श त्यांनी घालून दिला आहे.

आज त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांचे कुटुंबीय, कार्यकर्ते, समर्थक आणि नागरिक मनःपूर्वक शुभेच्छा देत आहेत.

"त्यांना निरोगी आयुष्य लाभो, आणि त्यांचे नेतृत्व असेच जनतेच्या सेवेसाठी कार्यरत राहो" हीच प्रार्थना.

## थोडक्यात



### गणपती बाप्पाचे जल्लोष्यात स्वागत

लोणी काळभोर (आरंभ पर्व) : आपल्या लाडक्या गणपती बाप्पाच्या आगमनाच्या मंगलमयी सोहळ्यास आज पासून सुरुवात झाली.अनेक दिवसांपासून मंडळांची देखावे बनविण्यासाठी लगबग चालू आहे.आज बाप्पांचे आगमन झाल्याने सर्वत्र उत्साह आहे .वरूण राजांने कृपा केल्याने सर्वत्र आनंदाचे वातावरण आहे. घरच्या गणपतीचे गणपती बाप्पा मोरयाच्या गजरात आगमन झाले .पहाटे पासुन दुपार पर्यंत गणेश मुर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली .हडपसर ,लोणी काळभोर, उरुळी कांचन परिसरातील सर्व प्रमुख गणेश मंडळाच्या श्रींची प्रतिष्ठापना संध्याकाळी वाजत गाजत झाली. पुण्याच्या सांस्कृतिक इतिहासामध्ये या सोहळ्याला अत्यंत महत्व आहे . येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकामुळे यंदाच्या सार्वजनिक गणेश उत्सवाला वेगळे स्वरूप आले आहे मंडळाचे विविध देखावे वगणेश फेस्टीव्हल साठी सारा परिसर सजला आहे .यावेळी धार्मिक .सांकृतिक, अध्यात्मिक ,कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

### यशवंत कारखान्याची जमीन विक्री करण्यास मंत्रिमंडळाची मान्यता

लोणी काळभोर (आरंभ पर्व) : थेऊर (ता. हवेली) येथील यशवंत सहकारी साखर कारखान्याच्या ९९.२७ एकर जमिनीच्या विक्रीस मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. मंगळवार, दि. २६ ऑगस्ट रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. उपमुख्यमंत्री अजित पवार व एकनाथ शिंदे या बैठकीस उपस्थित होते. या निर्णयानुसार पुणे कृषी उत्पन्न बाजार समिती (एपीएमसी) ही जमीन तब्बल २९९ कोटी रुपयांना खरेदी करणार असून, या व्यवहारातून मिळणारा निधी थकीत कर्जफेड, शेतकऱ्यांची ऊस बिले, कामगारांचे पगार तसेच शासनाचे विविध कर व इतर देणी भागविण्यासाठी वापरला जाणार आहे. एकेकाळी हवेली तालुक्याचे वैभव असलेला थेऊर येथील यशवंत सहकारी साखर कारखाना आर्थिक अनियमितेमुळे कोट्यवधी रुपयांचे कर्ज असल्यामुळे २०११ रोजी बंद करण्यात आला होता. तेंव्हा पासुन १४ वर्षे झाली सभासद व कामगार वनवास भोगत आहेत . कामगारांना पगार नाही की शेतकऱ्यांना त्यांच्या उसाचे पैसे मिळाले नाही . हा कारखाना रसातळाला गेला असुन सर्व राजकीय पक्ष फक्त निवडणूकीसाठी याचा उपयोग करत आहेत . तेव्हा पासून सभासदांना व कामगारांना फक्त आश्वासनाचे गाजर दाखवले जात आहे .स्व.आण्णासाहेब मगर व स्व.मणिभाई देसाई यांच्या स्वप्नांतील व पूर्व हवेलीचा मानबिंदू असणारा यशवंत सहकारी कारखाना पुढाऱ्यांच्या नाकर्तेपणामुळे बंद असल्यामुळे कामगारांचे व शेतकऱ्यांचे जीवन धुळीस मिळाले आहे.तेव्हा पासूनकारखान्याची जमीन महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडे गहाण ठेवण्यात आली होती. वाढते कर्ज, थकलेली ऊस बिले आणि कामगारांचे वेतन यामुळे शेतकरी आणि कामगार यांच्यात असंतोष होता. या पार्श्वभूमीवर कारखान्याच्या संचालक मंडळाने व पुणे एपीएमसीने जमिनीच्या विक्रीचा निर्णय घेतला. आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून अखेर राज्य मंत्रिमंडळाची अंतिम मंजुरी मिळाली आहे. या निर्णयामुळे कारखान्याच्या पुनरुज्जीवनाचा मार्ग मोकळा झाला असून, शेतकरी आणि कामगार वर्गाने सुटकेचा निश्वास सोडला आहे. “कित्येक वर्षांपासून आम्ही थकबाकीच्या पैशांची वाट पाहत होतो. आता सरकारच्या निर्णयामुळे आमचे देणे फेडले जाणार असल्याने दिलासा मिळाला आहे,” अशी भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली. कामगार संघटनांनीदेखील या निर्णयाचे स्वागत करत शासनाचे आभार मानले आहेत. स्थानिक जनप्रतिनिधींनी या निर्णयाचे स्वागत करून “यामुळे शेतकरी–कामगारांच्या समस्या दूर होतील आणि कारखान्याला नवसंजीवनी मिळेल,” असे मत व्यक्त केले.

# राज्यस्तरीय हुतात्मा राजगुरू वक्तृत्व स्पर्धेचा सांघिक चषक मुंबई विद्यापीठाकडे

## विद्यार्थ्यांनी प्रघल्पपणे विषयाची मांडणी करण्याची गरज - अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे पाटील

**किरण खुडे**



**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)** येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित हुतात्मा शिवराम हरी राजगुरू राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालय वक्तृत्व स्पर्धेमध्ये सांघिक विजेतेपदाचा चषक वरिष्ठ गटात मुंबई विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्राने आणि कनिष्ठ गटात पिंपरीच्या डॉ. डी.वाय. पाटील महाविद्यालयाने पटकावला. दोन्ही सांघिक गटात प्रत्येकी राजगुरू करंडक व ५ हजार रुपये रोख पारितोषिक देण्यात आले. वरिष्ठ व कनिष्ठ गटात अनुक्रमे पुण्याच्या गरवारे कॉलेजची भक्ती धावडे व कनिष्ठ गटात राजगुरू कॉलेजची तनिष्का शेलार यांनी प्रथम क्रमांक पटकावला. विजेत्यांना रोख बक्षीस व करंडक देऊन गौरविण्यात आले. स्पर्धेचे हे ३४ वे वर्ष होते. राज्यभरातून ८९ स्पर्धकांनी स्पर्धेत सहभाग घेतला.

या स्पर्धेचे उदघाटन संस्थाध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष नरेंद्र थिगळे, उपाध्यक्ष दत्तात्रेय टेमगिरे, अरिहंत पतसंस्थेचे अध्यक्ष सुशिल शिंगवी, संचालक बाळासाहेब सांडभोर, मुरलीधर खांगटे, अ‍ॅड. बाळासाहेब लिंभोरे, दत्तात्रेय सातपुते, प्राचार्य डॉ. एस.एस. पिंगळे, डॉ. एच.एम.जरे, उपप्राचार्य प्रा. व्ही. बी.दौंडकर उपस्थित होते.

संस्थाध्यक्ष अ‍ॅड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थी स्पर्धकांना अभ्यासपूर्ण, प्रघल्पपणे विषयाची मांडणी करण्याचे आवाहन केले. वाचनाने समृद्ध व्हा आणि भूमिका प्रामाणिकपणे मांडा, समाज तुम्हाला भरभरून देईल, असे त्यांनी सांगितले.

परीक्षक डॉ. तुषार चांदवडकर यांनी स्पर्धकांना शब्द समजून बोलावा, वाचन, चिंतन करावे व ज्ञानाची शक्ती उभी करण्याचे आवाहन केले.

या स्पर्धेत वरिष्ठ गटात प्रथम क्रमांक पुण्याच्या गरवारे कॉलेजची भक्ती धावडे (७५००/-), द्वितीय क्रमांक राजगुरू कॉलेजची साक्षी शिवेकर (५०००/-) आणि तृतीय क्रमांक तळेगाव ढमढेरे कॉलेजचा संकेत वडघुले (३०००/-) यांनी पटकावला. प्रत्येक विजेत्याला रोख रकमेसह हुतात्मा राजगुरू चषक देण्यात आला. कनिष्ठ गटात प्रथम क्रमांक राजगुरू कॉलेजची तनिष्का शेलार (५०००/-), द्वितीय क्रमांक नाशिकच्या एचपीटी कॉलेजची आर्या कोतकर (४०००/-) आणि तृतीय क्रमांक नारायणगावच्या सबनीस कॉलेजचा सुथार ओमाराव (३०००/-) यांचा आला. कनिष्ठ गटातील प्रत्येक विजेत्याला रोख रकमेसह स्व. साहेबरावजी बुट्टे पाटील करंडक देण्यात आला.

वरिष्ठ गटातील उत्तेजनार्थ पारितोषिकांतर्गत आकाश मोहिते (पारनेर), संतोष शिंदे (हडपसर), सुनील कचरे (पुणे) तर कनिष्ठ गटातील मिसबा खान (पुणे), जयेश पवार (ओतूर), दीक्षा पोखरकर (घोडेगाव) या विद्यार्थ्यांना प्रत्येकी २५००/- व प्रमाणपत्र देण्यात आले. स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ. तुषार चांदवडकर (नाशिक), डॉ. क्रांती गोसावी (शिरूर), मनीषा क्षेमकल्याणी, डॉ. संदीप तपासे (नाशिक) यांनी काम पाहिले. स्पर्धेचे आयोजन डॉ. दिलीप मुळूक व प्रा. धनंजय बोऱ्हाडे यांनी केले.

प्रास्ताविक डॉ. शिरीष पिंगळे, निकाल वाचन प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. निरज गव्हाणे, सूत्रसंचालन डॉ. गणेश धुमाळ, प्रा. ज्योती वाळुंज तर आभार डॉ. दिलीप मुळूक यांनी मानले.

## खेड तालुक्यात गणेशाचे भक्तीमय वातावरणात आगमन

**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)** खेड तालुक्यात तरुणाईच्या जल्लोषात वाजत-गाजत, गणपती बाप्पा मोरयाच्या निनादात व भक्तीमय वातावरणात गणरायाचे आगमन झाले. भाद्रपद गणेश चतुर्थीच्या मुहूर्तावर राजगुरुनगर शहरात व ग्रामिण भागात चैतन्यमयी भक्तीमय वातावरण दिसत होते. बुधवारी (दि.२७) घरगुती गणपती मुर्तीचे सकाळीच वाजत गाजत आगमण झाले. मागील वर्षीच्या तुलनेत यंदा मात्र मुर्तीचे भाव वाढलेले दिसून आले. सकाळी गणरायाच्या आगमनासह पावसाच्याही जोरदार सरी कोसळत होत्या. उत्साहाच्या वातावरणात भाविक गणेश मुर्ती खरेदी करुन वाजत - गाजत घरी नेत



होते. घरातील महीलांकडून औक्षण करुन गणरायाचे स्वागत करण्यात आले. राजगुरूनगर शहरातील बाजारपेठ, पंचायत समिती चौक, जुना मोटार स्टॅन्ड, वाडारोड या ठिकाणी गणेशभक्त, महिला व लहान मुलांनी गणेश मुर्ती, हार, फुले, वस्त्र खरेदी करण्यासाठी मोठी गर्दी केली होती.

## पन्नास लाख शेतकऱ्यांना बळ देणाऱ्या किसानक्राफ्टची २० वर्षे पूर्ण

**कृषी क्षेत्रातील नाविन्यपूर्णतेला जागतिक पातळीवर नेण्याची योजना**

**पुणे (दै. आरंभ पर्व)** कृषी यंत्रसामुग्री, अवजारे आणि बिजांमध्ये विशेषज्ञ असलेली कृषी तंत्रज्ञान कंपनी किसानक्राफ्ट लिमिटेडने आपला २० वा वर्धापन दिन दिमाखात साजरा केला. छोट्या व वंचित शेतकऱ्यांना परवडणारी उत्पादने पुरविण्याच्या उद्देशाने २००५ मध्ये सुरू झालेल्या या कंपनीने आज भारताच्या शेती क्षेत्रात विश्वास कमावला आहे. जागतिक कृषी-उपकरणे निर्यातीच्या क्षेत्रात ती दमदार कंपनी म्हणून पुढे येत आहे.

किसानक्राफ्टचे संस्थापक आणि अध्यक्ष रवींद्र अग्रवाल म्हणाले, “ज्या शेतकऱ्यांना सर्वात जास्त गरज आहे त्यांच्यापर्यंत परवडणारी आणि कार्यक्षम साधने पोहोचविणे



या एकाच ध्येयाने आम्ही सुरुवात केली. भविष्याकडे पाहताना जागतिक दर्जाची उपकरणे तयार करून आणि देशातील शीर्ष २० पिकांसाठी एंड-टू-एंड यांत्रिकीकरण उत्पादने पुरवून, भारतात आणि जगभरात शेतीच्या प्रत्येक टप्प्यावर कार्यक्षमता वाढवून भारताला लहान शेती यंत्रसामग्रीचे जागतिक केंद्र म्हणून स्थान देणे हे आमचे ध्येय आहे.”

किसानक्राफ्टने ग्रामीण भारतावर दूरगामी प्रभाव केला असून तो कृषी उत्पादकतेच्या पलीकडे ग्रामीण समुदायांच्या सामाजिक-आर्थिक रचनेपर्यंत विस्तारला आहे. छोट्या वंचित शेतकऱ्यांना आधुनिक उपकरणांचे मालक बनणे, चालविणे आणि त्यातून कमाई करणे यासाठी समर्थ करून कंपनीने उत्पन्न निर्मितीसाठी नवीन मार्ग निर्माण केले आहेत. त्यांच्या मेकॅनिक प्रशिक्षण कार्यक्रमांनी ग्रामीण उद्योजकतेला चालना दिली आहे आणि स्थानिक सेवा नेटवर्क तयार केले आहेत. तसेच त्यांच्या परवडणाऱ्या यंत्रांमुळे शेतकऱ्यांच्या नफ्यात लक्षणीय वाढ झाली आहे.

त्यांतील अनेक एकाच पीक हंगामात त्यांचा खर्च वसूल करतात. याचसोबत त्यांनी भाड्याने देण्याची व्यवस्था बळकट केली असून त्यामध्ये यंत्रांचे मालक सहकारी शेतकऱ्यांना मशीन भाड्याने देतात, मालमत्तेचा वापर सुधारतात आणि ग्रामीण उत्पन्न वाढवतात.

## सोमैय्या विद्याविहार विद्यापीठाने दिले भारतातील समाज-विज्ञान आणि मानव्यविद्या अध्ययनाला नवे स्वरूप

**पुणे (दै. आरंभ पर्व)** सोमैय्या विद्याविहार विद्यापीठाने डॉ. शांतिलाल के. सोमैय्या स्कूल ऑफ आर्ट्स आणि सोमैय्या स्कूल ऑफ सिव्हिलायझेशनच्या माध्यमातून कला समीक्षा आणि समाज-विज्ञान शाखेत पठडीतील शैक्षणिक पद्धतीच्या पलीकडे जाऊन शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्यांसाठी नवे आभ्यासक्रम सुरु करण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीच्या विषयातील मूलगामी ज्ञान मिळावे व जागतिक स्तरावर त्या विषयात झालेले संशोधन व प्रवाहांची ओळख व्हावी, आकादमीक तसेच खासगी क्षेत्रातील नोकरीसाठी लागणारी कौशल्ये विकसित करण्याच्या अनुषंगाने आखलेला अभ्यासक्रम आणि गरजू विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती—अशा आकर्षक




सुविधांचा मेळ घालून, पदवी तसेच पदव्युत्तर स्तरावरील अभ्यासक्रम या शैक्षणिक वर्षापासून प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. वेगाने प्रगती करणाऱ्या आर्थिक व्यवस्थेच्या बरोबरीने दृश्य कला व साहित्यात रस घेणाऱ्यांची संख्या देखील वाढत आहे. विशेषतः दृश्य कला क्षेत्राच्या वाढणाऱ्या व्याप्तीनुसार मुंबई सारख्या महानगरांमध्ये अनेक संस्थांना कलेच्या इतिहासाची जाणीव व त्याची समीक्षा करणाऱ्या तज्ञांची गरज आहे. डॉ. शांतीलाल सोमैय्या स्कूल ऑफ आर्ट्सच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आलेले आर्ट हिस्ट्री आणि व्हिज्युअल स्टडीज या विषयातील पदव्युत्तर स्तरावरील एम.ए. अभ्यासक्रम हा या दृष्टिकोनाच्या केंद्रस्थानी आहे. या क्षेत्रात मुंबईतील हा पहिला एमएफए-ट्रॅक उपक्रम आहे. सदर अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये दृश्य कला निगडीत मुलभूत कौशल्ये व सांस्कृतिक जाणिवांचा विकास आणि तदनुषंगिक उद्योगक्षेत्रातील संधींची तोंडओळख करून देण्याचा विद्यापीठाचा मानस आहे. एम.ए. इन आर्ट हिस्ट्री अँड व्हिज्युअल स्टडीज या अभ्यासक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना एका समीक्षकाच्या दृष्टीने केवळ भारतीयच नाही तर दक्षिण आशियाई, युरोपीय, अमेरिकन आणि आफ्रिकन कला परंपरेला देखील समजून घेण्यसाठी सज्ज केले जाईल. तसेच, केवळ अभिजात कला प्रकारांपुरतेच मर्यादित न राहता, वेगाने बदलणाऱ्या समकालीन जगातील कला व विशेषतः दृश्य कला निगडीत प्रवाहांची तोंड ओळख करून देण्यात येईल. आंतर विद्याशाखीय अध्ययन पद्धतीच्या अनुषंगाने कलेच्या क्षेत्राचा मानववंशशास्त्र, साहित्य, लिंगाधारित अभ्यास, चिन्हविज्ञान आणि समाजशास्त्र इत्यादी अभ्यासशाखांशी असणाऱ्या परस्पर संबंधांचा देखील धांडोळा घेतला जाईल. अभ्यासक्रमाचा भाग म्हणून विद्यार्थ्यांना रोजगारासाठी सक्षम करण्याच्या दृष्टीने कला संग्रह आणि संग्रह व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देखील दिले जाणार आहे. कला इतिहासकार, समीक्षक, क्युरेटर आणि सांस्कृतिक धोरणकर्ते यांची नवी पिढी घडवण्याच्या कार्यात उपरोल्लिखित पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या माध्यमातून विद्यापीठ मोलाची भर घालत आहे.

कला लेखक आणि क्युरेटर बनू इच्छिणाऱ्यांसाठी एम.ए. इन रायटिंग अँड आर्ट क्रिटीसिझम हा अभ्यासक्रम आखण्यात आला आहे. कला व समीक्षा क्षेत्रातील काही सर्वोत्तम व्यक्तींकडून विद्यार्थ्यांना शिकण्याची संधी मिळणार आहे. देशभरातील काही सर्वोत्तम लेखक, समीक्षक, गॅलरीस्ट, ऑक्शनर्स, इतिहासकार, समाजशास्त्रज्ञ, कवी, भाषांतरकारांकडून अभ्यासक्रमातील काही ठराविक भाग शिकवले जातील.

# ऐतिहासिक ठेवा पाहून परदेशी नागरिक हरखले

## 'ग्लोबल गणेश फेस्टिवल'मध्ये परदेशी नागरिकांसाठी दोन दिवस हेरिटेज वॉक व गणपती दर्शन; २०० जणांचा उत्स्फूर्त सहभाग

**पुणे (दै. आरंभ पर्व)** पुण्याचा ऐतिहासिक वारसा सांगणारे पेशवेकालीन त्रिशुंड गणपती मंदिर, ग्रामदैवत कसबा गणपतीचे दर्शन व इतिहास जाणून घेत, श्रीमंत भाऊ रंगारी भवनातील स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास अनुभवतानाच श्रीमंत दगडूशेठ गणपती बाप्पाचे दर्शन आणि पुण्याच्या गणेशोत्सवाची भव्यता, ऐतिहासिक ठेवा पाहून परदेशी पाहुणे हरखून गेले.



निमित्त होते, राष्ट्रप्रथम ट्रस्ट, सदैव फाउंडेशन व अमित फाटक फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ग्लोबल गणेश फेस्टिव्हल अंतर्गत पुण्यात शिकणाऱ्या परदेशी नागरिकांसाठी आयोजित केलेल्या हेरिटेज वॉकचे! महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभाग, पर्यटन विभाग व सांस्कृतिक विभागाचे या महोत्सवाला विशेष सहकार्य लाभले आहे. सावित्रीबाई फुले विद्यापीठांतर्गत विविध महाविद्यालयांत शिकणाऱ्या सुमारे ४०० विद्यार्थ्यांसाठी हा हेरिटेज वॉक व गणपती दर्शनाचे आयोजन केले आहे.

उपक्रमाच्या पहिल्या दिवशी आफ्रिका, बांगलादेश, श्रीलंका, युगांडा, घाना, तुर्कीस्थान, कझाकिस्थान, भूतान, नेपाळ, म्यानमार आदी देशांतील जवळपास २०० नागरिक सहभागी झाले. पर्यटन विभागाचे उपसचिव संतोष रोकडे, उपसंचालक शमा पवार, फेस्टिव्हलचे मुख्य समन्वयक अनिरुद्ध येवले, समन्वयक महेश साने, कार्यकारी अधिकारी ऋषिकेश कायत, प्रसिद्धीप्रमुख जीवराज चोले, चिन्मय वाघ, त्रिशुंड गणपती मंडळाचे सचिन पवार, सोहम पवार आदी उपस्थित होते.

दुपारी २ वाजता सोमवार पेठेतील त्रिशुंड गणपती मंदिर येथून या हेरिटेज वॉकला सुरुवात झाली. तत्पूर्वी याठिकाणी पारंपरिक पद्धतीने सर्व विद्यार्थ्यांचे औक्षण करण्यात आले. त्रिशुंड गणपतीचे दर्शन घेऊन मंदिराचा इतिहास विद्यार्थ्यांनी समजून घेतला. श्री शिवाजीराजे मर्दानी आखाडा यांच्या वतीने मर्दानी खेळांची प्रात्यक्षिके सादर झाली. इटली येथील अभिनेत्री एना मारा यांनीही मर्दानी खेळांचे प्रात्यक्षिक सादर करत लक्ष वेधून घेतले. टाळ्यांची उत्स्फूर्त दाद देत अनेकांनी हा अविस्मरणीय क्षण आपल्या डोळ्यांत अन कॅमेरात साठवून घेतला.

ग्रामदैवत कसबा गणपतीचे उत्सव मंडपात दर्शन घेतल्यानंतर मूळ मंदिराविषयी माहिती घेतली. एच. व्ही. देसाई महाविद्यालयाच्या प्रांगणात राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, उद्योजक पुनीत बालन यांनी परदेशी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. श्रीमंत भाऊ रंगारी गणपतीचे दर्शन, तसेच ऐतिहासिक भाऊ रंगारी भवनाची माहिती घेत स्वातंत्र्यलढ्याची चळवळ जाणून घेतली. श्रीमंत दगडूशेठ गणपती मंदिराची भव्यता अनुभवत, गर्दीतून मार्ग काढत परदेशी विद्यार्थ्यांनी बाप्पाची आरती केली. गणपती बाप्पाचे दर्शन झाल्यानंतर या विद्यार्थ्यांना मंडई ते स्वारगेट अशी मेट्रो सफारी घडवण्यात आली.

## ग्रामपंचायत दावडी, ता. खेड, जि. पुणे.

**निविदा नोटीस**

खालील कामांची सिलबंद निविदा ग्रामपंचायत दावडी, ता. खेड, जि.पुणे हे जिल्हा परिषद पुणे / सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडील नोंदणीकृत मक्तेदारी / ठेकेदारांकडून (२ लिफाफा पध्दतीने) मागवित आहे. कोऱ्या निविदांचा नमुना ग्रामपंचायत दावडी, ता. खेड, जि.पुणे यांच्याकडून दि. ०१/०९/२०२५ ते ०८/०९/२०२५ पर्यंत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०: ४० ते ०४: ३० या वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात विक्रीस उपलब्ध होतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | अंदाजपत्रकीय रक्कम | कोरी निविदा किंमत | इसारा रक्कम | कंत्राटदार वर्गीकरण | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे दावडी येथील डॉ. आंबेडकर नगर येथील सभामंडप दुरूस्ती करणे. | १५% मागासवर्गीय निधी सन २०२४-२०२५ | १,२४,५७७/- | ५९०/- | १२५०/- | सर्वसाधारण | ३ महीने |
| २ | भूमीगत गटर करणे. | १५वा वित्त आयोग | ३,७४,३८०/- | ५९०/- | ३५००/- | सर्वसाधारण | ३ महीने |

टीप : १) ठेकेदाराने कोरी निविदा मागणी अर्जासोबत प्रमाणित दाखला सादर करणे आवश्यक आहे. २) बंद लिफाफा पोस्टाने किंवा समक्ष दि. ०८/०९/२०२५ रोजी कार्यालयीन वेळेपूर्वी ०४: ३० वा. पर्यंत पोहचणे आवश्यक आहे. ३) सदर कामाबाबत निविदा अटी व शर्ती बाबतचा तपशील निविदा संचात नमूद असून त्या अटी व शर्तीस अधीन राहून निविदाधारक ठेकेदारास लागु राहतील याची नोंद घ्यावी. ४) विहित मुदतीनंतर बंद लिफाफा (दरपत्रके) स्वीकारली जाणार नाहीत. ५) प्राप्त दरपत्रके शक्य झाल्यास दि. ०९/०९/२०२५ रोजी सकाळी ११ : ०० वाजता सर्वांसमक्ष उघडली जातील, याची नोंद घ्यावी. ६) दरपत्रकांबाबत काही हरकत असल्यास त्याच ठिकाणी समक्ष घेण्यात यावी. ७) दरपत्रक स्विकृतीनंतर तक्रार/हरकत विचारात घेतली जाणार नाही. ८) सदर कामाची अनामत रक्कम भरल्याशिवाय कार्यारंभ आदेश दिला जाणार नाही. ९) दरपत्रके स्वीकारणे अथवा नाकारणेचे अधिकार राखून ठेवले आहेत. वरील अटी व शर्तीस अधीन राहून दरपत्रके सादर करावीत.

सही/-
ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत दावडी, ता. खेड, जि.पुणे.

सही/-
सरपंच
ग्रामपंचायत दावडी, ता. खेड, जि.पुणे.

# भूपेंद्र मोरे नगरसेवक व्हावेत यासाठी देखाव्यातून साकडे



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

यंदाच्या गणेशोत्सवात उभारण्यात आलेला एक विशेष देखावा सामाजिक कार्यकर्ते भूपेंद्र मोरे यांच्या कार्याचा गौरव करणारा ठरला आहे. भाविकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरलेल्या या देखाव्यातून मोरे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून समाजहितासाठी घेतलेली तळमळीची धडपड प्रकर्षाने समोर आली आहे. विशेष म्हणजे, नागरिकांनी यानिमित्ताने "मोरे हे आगामी पुणे महानगरपालिकेत नगरसेवक म्हणून निवडून यावेत" अशी साकडे गणरायाला घातली.

एका नागरिकाने साकारलेल्या या देखाव्यात भूपेंद्र मोरे यांनी केलेल्या विविध सामाजिक उपक्रमांना स्थान मिळाले आहे. शिक्षण, आरोग्य, पर्यावरण संवर्धन, महिलांचे सबलीकरण, वंचित घटकांच्या समस्या अशा विविध क्षेत्रातील त्यांच्या कार्याचा आढावा यातून घेण्यात आला आहे. त्याचबरोबर मोरे यांनी जनतेच्या प्रश्नांसाठी केलेले आमरण उपोषण, मोर्चे, आंदोलने, रास्ता रोको अशा लढाऊ स्वरूपातील आंदोलनांची झलक देखील दाखवण्यात आली आहे. त्यामुळे त्यांच्या कार्याचा व्यापक पट नागरिकांसमोर उभा राहिला आहे. याशिवाय मोरे यांना मिळालेले विविध पुरस्कार, गौरवचिन्हे तसेच वर्तमानपत्रांमध्ये प्रकाशित झालेल्या बातम्या या देखाव्यात समाविष्ट करण्यात आल्या आहेत. त्यामुळे हा देखावा केवळ सजावटीपुरता मर्यादित न राहता, एका सामाजिक कार्यकर्त्याच्या जीवनातील संघर्ष, योगदान आणि यश यांचा प्रेरणादायी प्रवास ठरला आहे. भूपेंद्र मोरे हे आगामी पुणे महानगरपालिकेचे प्रबळ दावेदार मानले जात असून, नऱ्हे व धायरी परिसरात त्यांचा भक्कम लवकिक आहे. स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की, "मोरे यांच्या नेतृत्वातून परिसराचा सर्वांगीण विकास होईल", अशी अपेक्षा या देखाव्यापुढे गणेशभक्तांनी व्यक्त केली. धार्मिकतेसोबत सामाजिक जाणीवा जागवणारा हा देखावा गणेशोत्सवातील चर्चेचा विषय ठरला असून, नागरिकांसाठी तो प्रेरणादायी ठरत आहे.

# गणपतीला चक्क आईस्क्रीमचा नैवेद्य

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आपण वेगवेगळे पदार्थ खाऊन आपल्या जीभेचे चोचले पुरवत असतो. जे आपल्याला आवडते ते देवाला का देऊ नये या भूमिकेतून गणरायाला चक्क आईस्क्रीमचा नैवेद्य रविवारी दाखविण्यात आला. सार्वजनिक गणेशोत्सवाचे यंदा १३३ वे वर्ष आहे. हे औचित्य साधून १३३ लिटर दूध, नॅचरल ऑरेंज पल्प आणि संत्र्याच्या सालींचा क्रश वापरून तयार केलेले १३३ लिटर संत्र्याच्या आईस्क्रीमचा नैवेद्य श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीला दाखविण्यात आला. पुण्यातील प्रसिद्ध किगा आईस्क्रीमच्या वतीने रविवारी गणपतीला हा नैवेद्य अर्पण करण्यात आला. त्यानंतर हे आईस्क्रीम प्रसाद म्हणून भाविकांना देण्यात आले. किगा आईस्क्रीमचे संचालक किरण सुरेश साळुंखे आणि गणेश राजेंद्र गोसावी यांच्यासह ट्रस्टचे विश्वस्त, पदाधिकारी आणि कार्यकर्ते या वेळी उपस्थित होते. हे आईस्क्रीम कसे तयार केले याची माहिती गणेश गोसावी यांनी दिली. ते म्हणाले, 'साधारण आठ दिवसांमध्ये तापमानाचे प्रमाण साधत संत्र्याच्या आकाराचे म्हणजेच गोलाकार स्वरूपाचे आईस्क्रीम तयार केले. हा आकार बनवत असताना आम्हाला कोल्ड स्टोरेजमध्ये उणे १८ ते २४ तापमानामध्ये थोड्या थोड्या कालावधीमध्ये जाऊन त्याला आकार देणे व तसेच त्याला व्यवस्थितपणे हाताळणे या गोष्टींच्या अडचणी येत होत्या.























दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
नवचेतना पुरस्कार २०२८
समाजासाठी समर्पित कार्याला सलाम !
॥ पुरस्कार श्रेणी ॥
आदर्श जनसेवक
आदर्श समाजसेवक
आदर्श उद्योजक
आदर्श पत्रकार
आदर्श खेळाडू
उत्कृष्ट अधिकारी
इतर विविध गौरव
आपल्या कार्याची दखल घेतली
जाण्याची ही संधी नका गमावू!
पुरस्कार कार्यक्रमासाठी नोंदणी सुरू;
आजच आपली स्पेस बुक करा
समाजासाठी झटणारे, प्रेरणा देणारे
मान्यवर यासाठी नक्की नाव नोंदवा!
मा.श्री.प्रतिक गंगणे
(व्यवस्थापकीय संपादक)
7276314142
मा.श्री.लक्ष्मण साबळे
(निवासी संपादक)
86052 84272
मा.श्री.अभिषेक मरगळे
(मार्केटिंग हेड)
9359421909
मा.श्री.डॉ.विश्वासराव आरोटे
(समूह संपादक)
9423388508


खडकवासला विधानसभेचे
आमदार
भिमराव आण्णा तापकीर
आपणांस वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
प्रतिक गंगणे
व्यवस्थापकिय संपादक
संपर्क : ७२७६३१४१४२
अभिषेक मरगळे मार्केटिंग हेड
शुभेच्छुक : दै.आरंभ पर्व मिडीया समुह
लक्ष्मण साबळे
निवासी संपादक
संपर्क : ८६०५२८४२७२

# शिवणे कामठे वस्तीतील जय हिंद मित्र मंडळाचा गणेशोत्सव उत्साहात

**'कला असावी कलेसारखी' लघुनाट्य आकर्षणाचा केंद्रबिंदू**




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

**लक्ष्मण साबळे**

गेल्या 41 वर्षांपासून गणेशोत्सवाची परंपरा जपणाऱ्या जय हिंद मित्र मंडळातर्फे यंदाचा गणेशोत्सव मोठ्या उत्साहात सुरू आहे. मंडळाचे अध्यक्ष सुरेंद्र कामठे यांच्या नेतृत्वाखाली धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले.

या वर्षीचे विशेष आकर्षण ठरले ते "कला असावी कलेसारखी" या लघुनाट्याचे. सागर स्वामी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या प्रयोगातून महिलांचा सन्मान राखावा तसेच कलामाध्यमातून समाजात जागृती व्हावी असा प्रभावी संदेश देण्यात आला. नाट्यप्रयोगातील कलाकारांमध्ये विजय काथवटे, मनीषा गंभिरे, करिश्मा कदम, स्वप्नील लोखंडे, सार्थक नेर, गणेश आंबोरे यांचा समावेश होता.

या कार्यक्रमाला ज्येष्ठ पत्रकार धनराज माने, उत्तम नगरचे माजी सरपंच सुभाष नाणेकर, किसान आघाडीचे अरुण दांगट यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

मंडळामार्फत गणेशोत्सवातच नव्हे तर तुळजापूर-अक्कलकोट यात्रा, दत्त जयंती, गणेश जयंती, महाप्रसादाचे आयोजन अशा धार्मिक उपक्रमांची परंपरा जोपासली जाते. या उत्सवात आकाश दांगट, किरण कामठे, भरत पवार, रोहित पाटील, राहुल मरळ, आकाश यादव आदी कार्यकर्त्यांचे विशेष योगदान राहिले आहे.

गणेशोत्सवाच्या औचित्याने घेण्यात आलेल्या या उपक्रमांना शिवणे-कामठे वस्तीतील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सामाजिक संदेश देणारे उपक्रम राबवत जय हिंद मित्र मंडळाने यंदाच्या गणेशोत्सवाला वेगळे आणि अर्थपूर्ण स्वरूप दिले आहे.



मा. श्री. लक्ष्मण साबळे (८६०५२८४२७२)

# उंबऱ्या गणपती मित्र मंडळ धायरीचा यंदाचा भव्य देखावा

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

**• श्री संत नामदेव महाराज पायरी**

धायरीतील जुने व प्रख्यात मंडळ म्हणून ओळख असलेल्या उंबऱ्या गणपती मित्र मंडळातर्फे यंदाच्या गणेशोत्सवात भक्तिमय आणि ऐतिहासिक देखावा साकारण्यात आला आहे. मंडळाने श्री संत नामदेव महाराज पायरी, पंढरपूर याची अप्रतिम प्रतिकृती उभारली असून भाविकांना पंढरपूरच्या पायरीचे दर्शन धायरीतच घडत आहे.

या मंडळाची स्थापना अनेक वर्षांपूर्वी झाली असून परिसरातील सर्व नागरिकांना एकत्र आणून गणेशोत्सव हा आनंद, भक्ती आणि सामाजिक उपक्रमांचा संगम व्हावा यासाठी सतत प्रयत्नशील असते. दरवर्षी वेगवेगळे देखावे व समाजोपयोगी उपक्रमांमुळे हे मंडळ गणेशभक्तांच्या मनात वेगळं स्थान निर्माण करून आहे. यंदाचा देखावा हा भक्तीच्या रंगात रंगलेला असून नामदेव महाराज पायरीची वास्तुशिल्पकृती, दिव्य रोषणाई आणि सजावट यामुळे भाविकांना खऱ्या पंढरपूरात आल्याचा अनुभव होत आहे. संत नामदेव महाराजांच्या भक्तीची परंपरा आणि विठ्ठलनामाच्या गजरात उभा असलेला हा देखावा पाहून भाविक भारावून जात आहेत.

मंडळाचे अध्यक्ष दत्ता नाना पोकळे, उपाध्यक्ष पद्माकर लायगुडे व कार्याध्यक्ष तुकाराम आबा चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली हा भव्य देखावा उभारण्यात आला आहे. अनेक कार्यकर्त्यांनी मनापासून परिश्रम घेऊन देखावा सजवला आहे.

गणपती बाप्पाच्या आराधनेसोबतच समाजात ऐक्य, भक्ती व संस्कार रुजविण्याचा संदेश या मंडळाने यंदाही दिला आहे. भाविक मोठ्या संख्येने दर्शनासाठी येथे दाखल होत असून "गणपती बाप्पा मोरया" च्या घोषणांनी संपूर्ण धायरी परिसर भक्तिमय वातावरणाने दुमदुमून जात आहे.

**"जाहिरात करायची आहे का?**

आपल्या परिसरातील बातमी प्रसिद्ध करायची आहे का? लगेच संपर्क साधा!

***दै. आरंभ पर्व - आरंभ एका नव्या पर्वाचा***

मा. श्री. लक्ष्मण साबळे - निवासी संपादक (८६०५२८४२७२)
मा. श्री. प्रतिक गंगणे - व्यवस्थापकीय संपादक (८६०५२८४२७२)










दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.